# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. १६६-२३** **दिनांक :- २४/०५/२०२३**

## घरफोडी गुन्हयातील सराईत आरोपीस घातक हत्यारासह अटक करुन घरफोडीचे ५ गुन्हे उघड. मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

वालीव पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नं. ३१९/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४५४, ३८० प्रमाणे दाखल गुन्हयाचा मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा समांतर तपास करीत असताना दिनांक १८/०५/२०२३ रोजी नमुद गुन्हयातील संशयीत आरोपीत इसम हा चोरी केलेला मोबाईल फोन विक्रीकरीता गौराई पाडा, जिवन नगर नाका येथे येणार असल्याची खात्रीशिर बातमी मिळाल्याने सदर ठिकाणी पंचासह सापळा लावला असता इसम नामे शारुक यासिन सरदार, वय २२ वर्षे, रा. रुम नं.०२, कृष्णा नगर चाळ, गणेश मंदिर जवळ, धानीवबाग नाका हा तेथे आला. त्यास ताब्यात घेण्याकरीता पोलीस त्याच्या जवळ जाताच त्याने त्याच्या जवळील धारदार शस्त्राने पोलीसांवर हल्ला करुन पोलीस हवालदार अनिल नागरे यांच्या हाताला दुखापत केली. तरी देखील पोलीसांनी योग्य बळाचा वापर करुन त्यास शिताफिने ताब्यात घेतले.

नमुद इसमाची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्याच्या ताब्यात १२.५ इंच लांबीचा लोखंडी धारदार सुरा व ०९ मोबाईल्स मिळुन आले. नमुद मोबाईल्स फोनचे आय.एम.ई.आय. क्रमांकांच्या सहाय्याने मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील गुन्हे अभिलेख तपासले असता खालील प्रमाणे घरफोडीचे ५ गुन्हे उघडकीस आले आहेत.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.र.क्र. |
|---|---|---|
| ०१. | वालीव | ३१९/२३, भा.दं.वि.सं. कलम ४५४,३८० |
| ०२. | वालीव | ७२१/२२, भा.दं.वि.सं. कलम ४५४,३८० |
| ०३. | विरार | ४८/२३, भा.दं.वि.सं. कलम ४५४,३८० |
| ०४. | विरार | ८७२/२२, भा.दं.वि.सं. कलम ३७९,३४ |
| ०५. | नालासोपारा | ५१९/२२, भा.दं.वि.सं. कलम ४५४,४५७,३८० |

सदर आरोपी याचे ताब्यातुन वरील प्रमाणे गुन्हयात चोरीस गेलेले ०९ मोबाईल्स एकुण किं. ८१,०००/- रुपये व एक लोखंडी धारदार सुरा असा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन सदर आरोपीने पोलीसांवर त्यास ताब्यात घेत असताना धारदार चाकुने हल्ला करुन दुखापत केली म्हणुन त्याचे विरुध्द वालीव पोलीस ठाणे ४६८/२०२३, भा.दं.वि.सं. कलम ३५३, ३३२, ५०४, ५०६ सह शस्त्र अधिनियम कलम ४,२५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१), ३७(३), १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश आंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) व श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पो.नि.राहुल राख, सपोनि. नितीन बेंद्रे, पोहवा. मनोहर तावरे, राजाराम काळे, महेश वेल्हे, अनिल नागरे, पो.अं. हनुमंत सुर्यवंशी यांनी केलेली आहे.

----oooo----